ठाणे, शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४३ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®

# दैनिक महाराष्ट्र सम्राट

मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे

संपादक : चंद्रकांत भोईटे

अग्रलेख

## तिसऱ्या आघाडीची हवा

विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे राज्यातील सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. सर्वच नेत्यांच्या सध्या राज्यभरात ठिकठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत.

.......पान २ वर



दैनिक महाराष्ट्र सम्राट
सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच !



## सरकारला पोलिसांच्या मदतीने दंगली घडवून पोलिसांचाच बळी द्यायचाय

(पान १ वरून) त्यामुळे येथे शांततेत जनजीवन चालू आहे. एकदा दंगल झाली की दंगलीनंतर जी सामाजिक द्वेषाची भिंत उभी राहते; ती पडायला नंतर २० - २५ वर्षे लागतात, समाजामध्ये जेव्हा विद्वेष पसरतो तेव्हा समाजामध्ये जो आपलेपणा असतो, तो गायब होतो. याचे भान ठेवण्याऐवजी निवडणुका जिंकण्यासाठी दंगली माजवल्या जात आहेत. काल बिहारमधील नेवाडा गावात ८० दलितांच्या झोपड्या जाळण्यात आल्या. एनिहिलेशन ऑफ कास्ट या ग्रंथातून डॉ. बाबासाहेबांनी जातिव्यवस्थेचे निर्मूलन ही संकल्पना मांडली होती. पण, आताची परिस्थिती पाहता, जाती व्यवस्थेचे उच्चाटन तर होताना दिसत नाहीच; किंबहुना, जातीयवाद अधिकच वाढताना दिसतोय आणि त्याला खतपाणी घातले जातेय. आज जर भाजप ४०० पार झाली असती तर काय झालं असतं, याचा विचार करा ! दलित, आदिवासी, ओबीसी, मुस्लीम यांच्या मदतीला संविधानही आले नसते. सगळेच उघड्यावर आले असते. कमीत कमी आज आमच्यासारखी माणसे बोलतात तरी!

बिहारच्या बेलछीमध्ये २७ मे १९७७ रोजी अकरा दलितांना जीवंत जाळण्यात आले होते. त्यावेळेस विरोधात असणाऱ्या इंदिरा गांधी यांना गावात जाण्यापासून रोखण्यात आले होते. मात्र, इंदिरा गांधी हत्तीवर बसून बेलछी गावात गेल्या होत्या. त्यावेळी लाखो आदिवासी आणि मागासवर्गीय त्यांच्या स्वागताला उभे होते. पण, आज एकटा तेजस्वी यादव बोलत आहे. सत्तेत असलेले शांत बसले आहेत. आज आपण एवढा प्रवास केला; देश एवढा पुढे गेला आणि आज आपण काय बघतोय तर दलितांचे गावच जाळून टाकले जातेय. दलितांनी भारतात राहूच नये का? काय परिस्थिती आहे दलितांची? आजही आपण त्यांना गावाच्या बाहेर बघतो. म्हणजे, ज्यांचे जीवन उद्ध्वस्त आहे : त्यांना तुम्ही जगूही देत नाहीत? खरंतर इंडिया आघाडीच्या सर्व नेत्यांनी नेवाड्याचा दौरा करून अत्याचारग्रस्त दलितांच्या सोबत आम्ही आहोत, हे सांगायला हवे आहे. त्यांना आता आधाराची गरज आहे. आपली मागणी आहे की, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यायला हवाय. ते स्वतः मागासवर्गीय आहेत. त्यांच्या राज्यात जर दलित, आदिवासी, मागासवर्गीयांवर अत्याचार होत असेल तर ते शोभनीय नाहीच. नितीशकुमार हे जर लोहिया, कर्पूरी ठाकूर यांचा वारसा सांगून समाजवादी विचारधारेवर चालत असतील तर त्यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारायलाच हवी. अशा घटनांकडे पाहून दलित, मागासवर्गीयांनी काय विचार करावा, हा देश आमचा राहिला आहे की नाही?, असा सवालही डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी उपस्थित केला.

## त्या स्थितीत नियमित करावीत मगच जीआर काढावा...

(पान १ वरून) मात्र या जीआरमध्ये प्रकल्पग्रस्त, प्रकल्पग्रस्तांच्या संघटना आणि ग्रामस्थांच्या सूचनांचा अंतर्भाव असला पाहिजे. याबाबतचा निर्णय सर्वमान्य, सुसंगत आणि सर्वसमावेशक असला पाहिजे. अशा प्रकारचा निर्णय पुन्हा पुन्हा होणार नसल्याने तो पूर्ण विचारांती आणि कुणावरही अन्याय होणार नाही, या दृष्टिकोनातून घेतला गेला पाहिजे. प्रकल्पग्रस्तांची बांधकामे नियमित करताना त्यांना पर्याप्त एफएसआय देखील मिळाला पाहिजे. भविष्यामध्ये भूखंडाचे एकत्रीतीकरण करून बांधकाम करण्याची इच्छा प्रकल्पग्रस्तांनी दर्शवली तर त्यालाही परवानगी देण्याची तरतूद जीआरमध्ये असावी. प्रकल्पग्रस्तांची सर्व बांधकामे नियमितीकरणाच्या निकषात बसवली गेली पाहिजेत. शासनाने सर्वमान्य, सर्वसमावेशक जीआर काढावा, कुणालाही वंचित ठेवू नये, अशी सूचना डॉक्टर संजीव नाईक आणि संदीप नाईक यांनी बैठकीत केली. या संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना पत्रही देण्यात आली आहेत.

## ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी एक रक्कमी देण्याची मागणी

(पान १ वरून) आता हवालदिल झाले आहेत. वारंवार शासन दरबारी पत्रव्यवहार करून देखील त्यांची थकीत देणे अदा न केल्यामुळे आज सर्व निवृत्त कर्मचारी तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांची भेट घेतली. असेच लवकरात लवकर आपली थकित देणे द्यावी अशी मागणी यांनी केली आहे. तसेच एक रकमी ही देवी द्यावी अशी मागणी देखील या निवृत्त कर्मचाऱ्यांनी केली आहे. यापैकी १६० फुल अधिक कर्मचारी आपल्या निवृत्तीनंतरच्या पेन्शनची वाट बघत मरण पावले आहेत मात्र तरी देखील त्यांच्या मरणानंतर देखील कुटुंबांना आवश्यक असणारा भत्ता किंवा पेन्शन जात नाही. अनेक कर्मचाऱ्यांना विविध आजारांनी ग्रासले आहे. एकीकडे आजारपणाचा खर्च आणि कुटुंबाचा उदरनिर्वाह या सगळ्या गोष्टींमुळे आता निवृत्त कर्मचारी मेटाकुटीला आले आहेत. निवृत्त कर्मचाऱ्यांची कोट्यावधींची देणे शासनाकडे प्रलंबित आहेत.

धर्मवीर आनंद दिघ साहेब यांनी परिवहन सेवा सुरू केली. परिवहन सेवेतून अनेक नागरिकांच्या हाताला काम मिळाले. त्याच परिवहन सेवेतील कर्मचाऱ्यांची थकीत देणे देण्यास प्रशासन दिरंगाई करत असल्याने नागरिकांनी मुख्यमंत्र्यांनी आमच्यावरती अन्याय करू नये अशी विनवणी केली आहे.

## गणेशोत्सव संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी

(पान १ वरून) येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी- विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससून डॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग- डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदी-विक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे नव्याने सुरू झालेल्या 'करंजा - द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत. यामध्ये, सायंकाळच्या सुमारास भरणाऱ्या बाजारामध्ये छोट्या करंदीपासून कोलंबी, पापलेट, सुरमई, रावस, कलेट, हलवा, कुपा, बोंबील अशा सुमारे ३० ते ४० प्रकारचे अनेक मासे विक्रीसाठी दिसून येत आहेत. तर करंजा येथील या बंदरात १०० रुपयांपासून १२०० रुपये किलोच्या दराने मासळी विक्री करण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. करंजा बाजारात बला, वाम, पाला, माखली, मांदेली, ढोमी, पाकट, शिंगाला, चिंबोरी असे मासेदेखील विक्रीसाठी असल्याचे दिसून आले आहे. तर, या मासळी बाजारात सुरमई, कोलंबी, कुपा, पापलेट यांना अधिक मागणी आहे.

## 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ सफाई कर्मचारी हा मुंबईचा खरा हिरो

(पान १ वरून) या स्वच्छता पंधरवडा मोहिमेकरिता सर्वांची भागीदारी असायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले. मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छता ही सेवा अभियानाच्या उपक्रमाद्वारे आर.आर.आर. (रिड्युस, रियुज, रिसायकल) केंद्र उभारून पर्यटन स्थळावर शुन्य कचरा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. 'एक पेड माँ के नाम' या उपक्रमांअंतर्गत वृक्षारोपण आणि सौंदर्यीकरण करण्याचे काम सुरू आहे. नियमित स्वच्छ न होणारी ठिकाणे शोधण्यात आली असून अशी ठिकाणे कायमस्वरूपी स्वच्छ राहील, याकरिता त्रिसुत्री नियोजन करण्यात आले आहे. यासाठी सर्वांचा सहभाग आवश्यक आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, स्वच्छ भारत अभियानात महाराष्ट्र कुठेही कमी पडणार नाही. स्वच्छ भारत अभियानात देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. या स्वच्छ भारत अभियानांतर्गत मुंबई महानगरपालिकेने दीड लाख झाडे पावसाळ्यात लावली आहे. या अभियानामध्ये ९,३५९ कार्यक्रमाची नोंदणी झाली असून सीटीयू (क्लिनलीनेस टार्गेट युनिट) अंतर्गत ४,५२० ठिकाणे शोधली असून या ठिकाणचा कचरा उचलला जाणार आहे. याकरिता जनसहभागाचे ४,१११ कार्यक्रम राबविले जाणार आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते या अभियानांचा शुभारंभ झाला. गिरगाव चौपाटी येथे मुख्यमंत्र्यांनी स्वत: स्वच्छतेची सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी ट्रॅक्टर चालवून मशीनद्वारे कचरा संकलन केले. त्याचबरोबर 'करूया वाईट विचार नष्ट, स्वच्छ करूया आपला महाराष्ट्र' हा संदेश देणाऱ्या फलकावर स्वाक्षरी केली.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक आरोग्य विभाग
दुसरी मुदत वाढ निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील मध्यवर्ती औषधी भांडारा तर्फे महानगरपालिकेच्या रुग्णालये, दवाखाने, आरोग्य केंद्रे यांना दैनंदिन वापरासाठी लागणा-या औषध खरेदीसाठी ऑनलाइन निविदा मागविण्यात येत आहे. दुसरी मुदत वाढ निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेतस्थळ https://mahatenders.gov.in वर दि.२०/०९/२०२४ ते दि.२६/०९/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत उपलब्ध होतील. दि. २६/०९/२०२४ रोजी १६.०० वाजेपर्यंत ऑनलाइन निविदा स्विकारण्यात येतील. दि. २६/०९/२०२४ रोजी १६.३० वाजता स्विकारलेल्या निविदा ऑनलाइन उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/आरोग्य/५२०/२०२४-२५ सही/-
दि:१९.०९.२०२४ उप-आयुक्त (आरोग्य)
Pls visit our oficial web-site ठाणेमहानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत "महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकासासाठी विशेष तरतूद" या लेखाशिर्षका अंतर्गत १) ठा.म.पा हद्दीतील लोकमान्यनगर येथील स्व.रामचंद्र ठाकुर तरण तलावाच्या परिसरात विकास कामे करणे. २) ठा.म.पा हद्दीतील शास्त्रीनगर येथे उन्नती गार्डन (धर्मवीर आनंद दिघे मैदान) मध्ये खुला रंगमंच बांधणे. ३) ठाणे महानगरपालिका हद्दीमध्ये मंजूर झालेल्या तरण तलावांमध्ये अतिरिक्त कामे करणे ४) ठा.म.पा हद्दीतील लिटील फ्लॉवर शाळेसमोरील मैदान विकसित करुन खुला रंगमंच,कुंपन भिंत व सुशोभिकरण करणे. ५) ठाणे महानगरपालिका हद्दीतील विविध ठिकाणी समाज मंदिरे, व्यायाम शाळा, समाज भवन विकसित करणे. ६) ठा.म.पा हद्दीतील वर्तकनगर येथील आनंदीबाई रुग्णालय व प्रसूतीगृह विकसित करुन कॅशलेस हॉस्पिटलची निर्मिती करणे. ७) ठा.म.पा हद्दीतील लोकमान्यनगर पाडा नं.०१ येथील बचत गट इमारतीची रंगरंगोटी व समोरील जागेत शेड बांधणे.८) ठा.म.पा हद्दीतील मोघरपाडा येथील कान्होजी आंग्रे उद्यानामध्ये कुंपन भिंत व उद्यान बांधणे. या आठ कामांकरीता निविदा ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत. सदर निविदा प्रक्रीयेमध्ये ज्या निविदाकारांवर शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था, महानगरपालिका ई. मार्फत नोंदणी रद्द करणेबाबत / काळ्या यादीत टाकणेबाबत कार्यवाही करण्यात आली आहे अथवा प्रस्तावीत आहे अशा निविदाकारांना निविदा भरता येणार नाही.निविदा सूचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेच संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथे दि.२०.०९.२०२४ ते २७.०९.२०२४ पर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा महापालिकेचे संकेतस्थळावर दि.२७.०९.२०२४ रोजी पर्यंत १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. सदर निविदा दि. २७.०९.२०२४ रोजी १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधींसमक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/५२४/२०२४-२५ **सही/-**
दि:१९.०९.२०२४ नगर अभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका, ठाणे
www.thanecity.gov.in

# संपादकीय...



संपादक–चंद्रकांत भोईटे

## तिसऱ्या आघाडीची हवा

विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे राज्यातील सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. सर्वच नेत्यांच्या सध्या राज्यभरात ठिकठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत. या दौऱ्यांच्या माध्यमातून आगामी निवडणुकीची रणनीती आखली जात आहे. उमेदवारांची चाचपणी केली जात आहे. विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडी विरुद्ध महायुती अशी मुख्य लढत होण्याची शक्यता आहे. परंतु राज्यात तिसऱ्या आघाडीचीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. तिसऱ्या आघाडीमध्ये संभाजीराजे छत्रपती, माजी खासदार राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू यांच्यासह आदी काही नेत्यांचा सहभाग असल्याची शक्यता आहे. विधानसभा निवडणुकीत राज्यात दरवेळी तिसऱ्या आघाडीचा पर्याय उभ केला जातो. परंतु यातून काही निष्पन्न होते का हा प्रश्न अनुत्तरीत आहे. कारण राज्यात व केंद्रात दोन गट प्रामुख्याने राजकारणात पडले आहेत. एक म्हणजे राष्ट्रीय स्तरावर इंडिया आघाडी विरोधात एनडीए आघाडी अशी लढत आहे. तसेच विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडी विरोधात महायुती अशी मुख्य लढत होणार आहे. असे असताना राज्यात तिसरी आघाडी वेगळा पर्याय ठरू शकेल काय असा प्रश्न आता चर्चेत येत आहे.

तिसऱ्या आघाडीच्या संदर्भात बैठकांचा धडाका सुरु झाला आहे. राज्यातील महायुती सरकारला प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी पांठिबा दिला आहे. असे असतानाच आता बच्चू कडू यांनी काँग्रेस आणि राज्यातील भारतीय जनता पक्षाला इशारा दिला आहे. काँग्रेस आणि भाजपाने लुटणारी व्यवस्था निर्माण केली. त्या भाजपा आणि काँग्रेसला उखडून फेकण्याचे दिवस आले आहेत, असे विधान आमदार बच्चू कडू यांनी एका सभेत बोलताना केले आहे. त्यांच्या या विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आली आहे.

आमदार बच्चू कडू यांनी काँग्रेस व भाजपा ला उकडून फेकण्याचे दिवस आले आहेत, असे वक्तव्य केल्यामुळे त्यांना महाविकास आघाडी व महायुतीमुळे महायुती यांना पाठिंबा द्यायचा नाही हे स्पष्ट आहे. परंतु तिसरी आघाडी उभारून राज्यात ते वेगळा पर्याय देऊ शकतात का याचा विचार तिसरी आघाडीच्या नेत्यांनी करणे आवश्यक आहे. अन्यथा विधानसभा निवडणुकीत भाजपाच्या विजयाला तिसऱ्या आघाडीमुळे हातभार लागू शकतो. दरवेळी तिसरी आघाडी ही शक्ती वेगवेगळ्या पक्षांमधून उभी राहते. परंतु त्याचा फायदा महाविकास आघाडीला न होता थेट महायुतीला होतो असे दिसून आले आहे. त्यामुळे तिसऱ्या आघाडीची आघाडीबद्दल उलट सुलट चर्चा होत असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांची आणि शेतमजुरांची लढाई गेल्या ७५ वर्षांपासून आपण लढतो आहोत. अजूनही शेतकऱ्यांना आणि शेतकऱ्यांच्या पोरांना मानसन्मान भेटत नाही. शेतकऱ्यांना अजून आत्महत्या करण्याची वेळ येते. त्यामुळे आता ही बदल्याची भावना निर्माण होत आहे. आता येणारी ही निवडणूक बदला घेणारी असेल. ज्यांनी-ज्यांनी धर्म आणि जात सांगून आमचे मत घेतले त्यांना जागा दाखवल्याशिवाय राहायचे नाही. कांद्यामुळे आम्हाला ज्यांनी ज्यांनी रडवले मग काँग्रेस असूद्या अन्यथा भारतीय जनता पक्ष. गेल्या ७५ वर्षात भाजपा आणि काँग्रेसने दोन्ही पक्षांनी राज्य केले. दोघांनीही आमच्या डोळ्यात पाणी काढले. शेतकरी रात्रींचा दिवस आणि दिवसाची रात्र करतो, मेहनत करतो, कष्ट करतो. ज्या शेतीमधून शेतकरी पीक घेतो, ऊन, वारा, पाऊस कशाचीही पर्वा न करता आमचा शेतकरी कष्ट करतो. मात्र, काँग्रेस आणि भाजपाने लुटणारी व्यवस्था निर्माण केली. त्या भाजपा आणि काँग्रेसला उखडून फेकण्याचे दिवस आले आहेत, असे आमदार बच्चू कडू यांनी म्हटले आहे. बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवरून महायुती सरकारवर हल्लाबोल केला. आमदार बच्चू कडू यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून सत्ताधाऱ्यांना लक्ष्य केले आहे. परंतु सध्या काँग्रेस सत्तेवर नाही तसेच काँग्रेसची विचारधारा स्पष्ट आहे, ती धार्मिक विचारांवर नाही. असे असताना बच्चू कडू काँग्रेसला का विरोध करतात हे समजत नाही. तिसरी आघाडी विधानसभा निवडणुकी वेळी उभी करताना या आघाडीच्या नेत्यांची विचारधारा धार्मिक कट्टरवादाचीआहे की पुरोगामी आहे याचा विचार झाला पाहिजे. परंतु हा विचार तिसऱ्या आघाडीत दिसत नाही. त्यामुळे लोकशाहीचा विचारांना धक्का बसू शकतो. राज्यातील विधानसभा निवडणूक काही दिवसांवर येऊन ठेपली आहे. त्या दृष्टीने सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी मुख्य लढत असली, तरी काही नेत्यांकडून तिसऱ्या आघाडीचे प्रयत्न सुरु आहेत. त्यासंदर्भात नुकतीच पुण्यात बैठकही पार पडत आहे. या बैठकीला संभाजीराजे छत्रपती, राजू शेट्टी, आमदार बच्चू कडू तसेच इतर पक्षांचे नेते हजर होते. राजकीय वर्तुळात तिसऱ्या आघाडीची चर्चा सुरु असतानाच आता राष्ट्रवादी काँग्रेसचे ( शरद पवार गट ) प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी बच्चू कडू यांना महाविकास आघाडीत येण्याचे आवाहन केले आहे. तसेच तिसऱ्या आघाडीत कोणते पक्ष सामील होणार हे अजून ठरलेले नाही. त्यामुळे निवडणुकीची रणनीती तिसरी आघाडी केव्हा आखणार आणि विरोधकांना सामोरे कसे जाणार हा प्रश्न निर्माण होतो.

राज्यात भारतीय जनता पक्षाला अप्रत्यक्ष मदत होणार नाही, याची काळजी घेऊ असेही तिसऱ्या आघाडीच्या नेत्यांनी म्हटले आहे. सत्ताधारी पक्षातून काही नेते महा विकास आघाडीच्या मतांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करतील, अशी भीती महा विकास आघाडीच्या काही नेत्यांनी बोलून दाखवली आहे. याचे कारण म्हणजे गत विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने राज्यात तिसरा पर्याय उभारला होता. पण त्याचा अप्रत्यक्ष राजकीय लाभ महायुतीला झाला होता. त्यामुळे राज्यात विचारांच्या अधिष्ठानावर निवडणूक वाढवणे महत्वाचे आहे. छोट्या छोट्या प्रादेशिक पक्षांची ताकद राज्यात नाही असे दिसते. हे पक्ष जेव्हा संघटित होतात, तेव्हा त्यांची विचारधारा स्पष्ट नसेल तर मतदान विभागून अन्य युतीला राजकीय फायदा मिळू शकतो. त्यामुळे अमुक पक्ष योग्य नाहीत असे म्हणून स्वतःची प्रतिमा सुधारण्यासाठी तिसरी आघाडी नसणे हे केव्हाही इष्टच आहे. तिसऱ्या आघाडीने आत्तापर्यंत राज्य पातळीवर सवता सुभा करून मते मागणे, तेही ऐन निवडणुकिवेळी हे योग्य वाटत नाही.

## बाळासाहेबांनी नियुक्त केलेले शिवसेनेचे पहिले विभागप्रमुख तथा माजी ज्येष्ठ नगरसेवक विक्रम मोरे यांचे निधन

ठाणे : ठाण्यातील चंदनवाडी परिसरातील ज्येष्ठ माजी नगरसेवक तथा शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी पहिले नियुक्त केलेले विभागप्रमुख असलेले विक्रम गणपत मोरे यांचे वृद्धापकाळाने गुरुवारी सकाळी निधन झाले. निधनासमयी त्यांचे वय ७९ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी कुसुम मोरे व २ मुले संतोष आणि महेश यांच्यासह नातवंड असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने चंदनवाडी आणि खोपट परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

विक्रम गणपत मोरे (भाऊ) हे ठाणे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर, शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख आनंद दिघे यांच्या कार्यकाळातील ज्येष्ठ शिवसैनिक म्हणून खोपट परिसरात कार्यरत होते. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी विक्रम मोरे यांना पहिले विभागप्रमुख म्हणून १९७४ साली नियुक्त केले होते. खोपट परिसरातील पहिली शिवसेना शाखा विक्रम मोरे यांनी सुरू केली. तेव्हापासून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या आदेशाने शिवसेनेच्या अनेक चळवळी, आंदोलने, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमात त्यांचा सहभाग होता. १९७४ साली त्यांनी खोपट विभागातून ठाणे महानगरपालिकेची निवडणूक लढविली होती. त्यानंतर १९८६ साली पुनः ठाणे महानगर पालिकेची निवडणूक लढवून ते विजयी झाले होते. तर २००४-०५ साली ते ठाणे परिवहन समितीचे सदस्य होते.

चंदनवाडी शिवसेना शाखेतही त्यांचा वावर होता. चंदनवाडी गणेश सेवा मंडळच्या गणेशोत्सव आणि नवरात्रौ उत्सव यामध्येही त्यांचा सहभाग असायचा. राजकारण आणि समाजकारण बरोबरच आपल्या भावकी आणि गावकीसाठी त्यांनी योगदान दिले. ठाणे शहरात खेड तालुका रहिवासी संघाच्या माध्यमातून अनेक शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन असायचे. चंदनवाडी परिसरात माजी नगरसेवक रघुनाथ मोरे, दत्ताराम मोरे, शिक्षण मंडळ सभापती हरिभाऊ पाष्टे, माजी खासदार राजन विचारे यांच्या कार्यकाळात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या मार्गदर्शनाने विक्रम मोरे यांनीही ठाण्यात शिवसेनेची बीजे पेरली, वाढवली. अनेक निवडणुकीत त्यांनी सक्रिय सहभाग घेत ठाण्यातील शिवसेनेचा गड मजबूत केला. त्यांच्या निधनाने चंदनवाडी आणि खोपट परिसरात शोककळा पसरली असून



जवाहरबाग स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी जुने जाणते शिवसैनिक, आजी माजी नगरसेवक व नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते.



## ठाण्याच्या उपवन तलावात मृतदेह आढळला

ठाणे - ठाण्याच्या उपवन तलावात पुरुषाचा मृतदेह आढळल्याची घटना गुरुवारी -सकाळी ७-४३ वाजण्याच्या सुमारास उघडकीस आली. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन, वर्तकनगर पोलीस अग्निशमन दलाचे अधिकारी यांची उपस्थिती होती. मृतदेह वर्तकनगर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आला.

गुरुवारी सकाळी ७-४३ वाजण्याच्या सुमारास ठाण्याच्या गणपती मंदिर जवळ, उपवन तलाव, उपवन, ठाणे (प.) या ठिकाणी उपवन तलावामध्ये ४० ते ४५ वर्षीय एका अज्ञात पुरुषाचा मृतदेह सापडला. नागरिकांना मृत दिसल्यानंतर वर्तकनगर ओलीसांना दिलेल्या माहिती नंतर घटनास्थळी पट्टी व्यवस्थापन,विभाग अग्निशमन दलाचे जवान व आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांच्या मदतीने मृतदेह तलावामधून बाहेर काढून वर्तकनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. सदर अज्ञात व्यक्तीचा मृतदेह वर्तकनगर पोलीस कर्मचारी यांच्या उपस्थितीमध्ये रुग्णवाहीकेतून पुढील कार्यवाहीसाठी जिल्हा शासकीय रुग्णालय, ठाणे येथे पाठविण्यात आला आहे.

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१,
दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०८७

जा.क्र. मनपा/आस्था /१९२४/२०२४-२५ दि. १९/०९/२०२४

संदर्भ क्र. :- जा.क्र.मनपा/आस्था/ १८४३/२०२४-२५, दि. १३/०९/२०२४ रोजीची जाहीर सूचना

**शुध्दीपत्रक**

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील मिरा भाईंदर महानगरपालितील शिक्षण विभागामधील माध्यमिक वर्गासाठी इंग्रजी, गणित / विज्ञान, मराठी व समाजशास्त्र तसेच उर्दु भाषा वर्गासाठी ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात १७ शिक्षक (माध्यमिक) उपलब्ध करून घेणेबाबत तात्पुरत्या स्वरुपात ठोक मानधन तत्वावर १० महिन्याच्या कालावधीकरीता संदर्भीयान्वये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.
सदर जाहीर सूचनेत शैक्षणिक अर्हता व व्यावसायिक पात्रता पूर्ण करणाऱ्या इच्छूक व पात्र उमेदवारांकडून दि.२४/०९/२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत मुलाखतीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविण्यात आले होते. त्याऐवजी दि.२४/०९/२०२४ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत उमेदवारांनी मुलाखीतीसाठी मा. स्थायी समिती सभागृह, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे उपस्थित रहावे.
उर्वरित जाहीर सूचनामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र. मनपा । मावज (ई-२८७५०७८/ २०२४-२५
दि. १९/०९/२०२४

सही/-
(संजय दोंदे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

जा. क्र. १४२७/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर
२१० दुसरा माळा,
प्रशासकिय कार्यालय ब शासकीय कार्यालय
बोईसर रोड, कोळगांव,
पालघर (प) - ४०१४०४
दि ११/९/२४

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, पालघर विभाग, पालघर

जाहीर नोटीस
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ओ वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ३६१/२०२४

ज्या अर्थी, गणेश कृपा वेल्फेअर सोसायटी (नालासोपारा पूर्व) रुम नं. ४०८, साई छाया अपार्टमेंट, नारीया नगर, ठाकुर शाळेच्या जवळ, मोरेगांव, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त सौ. प्रिती परशुराम धुरी यांनी कलम २२ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे. व तो सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक १०.०९.२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्या अर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांचे आत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक २१.१०.२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दिनांक ११.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पालघर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर

जा. क्र. १४२६/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर
२१० दुसरा माळा,
प्रशासकिय कार्यालय ब शासकीय कार्यालय
बोईसर रोड, कोळगांव,
पालघर (प) - ४०१४०४
दि ११/९/२४

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, पालघर विभाग, पालघर

जाहीर नोटीस
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ओ वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ३६०/२०२४

ज्या अर्थी, गणेश कृपा वेल्फेअर सोसायटी (नालासोपारा पूर्व) रुम नं. ४०८, साई छाया अपार्टमेंट, नारीया नगर, ठाकुर शाळेच्या जवळ, मोरेगांव, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त सौ. प्रिती परशुराम धुरी यांनी कलम २२ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे. व तो सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक १०.०९.२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्या अर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांचे आत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक २१.१०.२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दिनांक ११.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पालघर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर

जा. क्र. १४२५/२४
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर
२१० दुसरा माळा,
प्रशासकिय कार्यालय ब शासकीय कार्यालय
बोईसर रोड, कोळगांव,
पालघर (प) - ४०१४०४
दि ११/९/२४

सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, पालघर विभाग, पालघर

जाहीर नोटीस
(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२- नियम ७ व ७ओ वाचावे)

बदल अहवाल क्रमांक : ३५९/२०२४

ज्या अर्थी, गणेश कृपा वेल्फेअर सोसायटी (नालासोपारा पूर्व) रुम नं. ४०८, साई छाया अपार्टमेंट, नारीया नगर, ठाकुर शाळेच्या जवळ, मोरेगांव, नालासोपारा पुर्व ता. वसई जि. पालघर या सार्वजनिक विश्वस्त व्यवथेच्या सादरकर्ता विश्वस्त सौ. प्रिती परशुराम धुरी यांनी कलम २२ यामध्ये बदला करिता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे. व तो सहायक धर्मादाय आयुक्त यांनी दिनांक १०.०९.२०२४ रोजी तात्पुरता स्विकृत केलेला आहे, त्या अर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधीत लोकांना सदर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप / हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांका पासून ३० दिवसांचे आत सहायक धर्मादाय आयुक्त यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर बदल अहवालास आपली काहीही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती दिनांक २१.१०.२०२४ रोजी अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
आज दिनांक ११.०९.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहाय्यक धर्मादाय आयुक्त, पालघर यांच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

सही/-
अधिक्षक
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
पालघर विभाग, पालघर

ठाणे, शुक्रवार दि. २० सप्टेंबर २०२४ वर्ष : १३, अंक : १४३ , पाने : ४, किंमत : २ रुपये Maharashtra Samrat Maharashtra Samrat dainikmahasamrat@gmail.com Reg. No. THC/58/2024-2026

सम्राट अनेक परंतु बातम्यांचा एकच!®
दैनिक महाराष्ट्र सम्राट
मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, नवी मुंबई, रायगड, पालघर, पुणे
संपादक : चंद्रकांत भोईटे



अग्रलेख

**तिसऱ्या आघाडीची हवा**

विधानसभेची निवडणूक जवळ आल्यामुळे राज्यातील सर्वच पक्ष कामाला लागले आहेत. सर्वच नेत्यांच्या सध्या राज्यभरात ठिकठिकाणी सभा, मेळावे आणि आढावा बैठका सुरु आहेत.

.......पान २ वर

ई-पेपरसाठी नियमित पहा...
ePaper PDF
www.maharashtrasamrat.com

**तापमान**

कमाल ३१° से | किमान २६° से

**बाजार**

सोने ७४,४५० | चांदी ९१,000

**डोकं खाजवा** –अशोक सुतार



मुलगा व्हॉट्स अपवर ग्रुप अॅडमिन आहे, हेच चिंतेचे कारण आहे, डॉक्टर साहेब........

# सरकारला पोलिसांच्या मदतीने दंगली घडवून पोलिसांचाच बळी द्यायचाय

## राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांचा आरोप

- बिहार जळीतकांड प्रकरणी नितीशकुमार यांनी राजीनामा द्यावा
- दलित, आदिवासींना या देशात जगण्याचाही अधिकार नाही का?

**ठाणे : भिवंडीत शांतता प्रस्थापित करण्यासाठी पोलिसांनी सौम्य लाठीचार्ज केला आणि त्याची जबरदस्त किंमत तेथील पोलीस उपायुक्तांना मोजावी लागली, असा दावा करत सरकारला पोलिसांच्या मदतीने दंगली घडवून पोलिसांचाच बळी द्यायचा आहे, असा आरोप राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. भिवंडी येथे धार्मिक दंगल माजविण्याचा सत्ताधाऱ्यांचा प्रयत्न होता. मात्र, हा प्रयत्न पोलीस उपायुक्तांनी हानून पडला. त्यामुळेच त्यांची बदली करण्यात आली आहे, असा आरोप करून पोलिसांचा सत्ताधाऱ्यांकडून राजकीय हत्यार म्हणून वापर केला जात असल्याची टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस तथा आ. डॉ.जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषदेत केली.**



भिवंडीतील घुंघटनगर येथील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाची गणेशमूर्ती विसर्जनासाठी जात असताना धार्मिक विद्वेष पसरविण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यावेळेस पोलिसांनी हस्तक्षेप करीत लाठीचार्ज केला. या घटनेनंतर पोलीस उपायुक्त श्रीकांत परोपकारी यांची तडकाफडकी बदली करण्यात आली आहे.

या संदर्भात डॉ.जितेंद्र आव्हाड म्हणाले की, आपणाला दोन्ही समाजातील सुजाण नागरिकांनी माहिती दिली की, जर या पोलीस उपायुक्तांनी मध्ये उडी घेतली नसती तर भिवंडीत दंगल झाली असती; दंगल रोखणार्या अधिकाऱ्याला असे बक्षिस दिले जात असेल तर संपूर्ण पोलीस दलाचे मनोबल खच्चीकरण होणार नाही तर काय होईल? आपणाला अंतर्गत माहिती अशी मिळत आहे की, या बदलीला पोलीस दलातील अनेकअधिकाऱ्यांनी प्रचंड विरोध केला आहे. तेथील बीजेपीचा एक राजकीय नेता ही दंगल घडवू इच्छित होता. दंगल झाली नाही आणि त्याचे परिणाम म्हणून पोलीस उपायुक्तांची बदली करण्यात आली. याचा अर्थ स्पष्ट आहे की या सरकारला आगामी निवडणुकीत पराभव पत्करावा लागणार असल्याचे सर्वे



आले आहेत. त्यामुळेच धार्मिक ध्रुवीकरण करण्यासाठी काहीही करून सत्ताधारी वर्गाला दंगल भडकवायची आहे. पोलिसांना हत्यार म्हणून पुढे पाठवायचे आणि दंगल घडवायची, हे तत्व सरकारचे आहे . मी पोलिसांनाच विनंती करेन की, तुम्ही राजकीय हत्यार बनू नका. या सरकारला दंगल घडवूनच निवडणूक जिंकायची आहे. त्यांच्या हातचे बाहुले बनू नका. आपल्या देशातील हिंदूंना कधीच आक्रमक हिंसा आवडत नाही. (पान २ वर)

**प्राण गेले तरी बेहत्तर, संविधान बदलू देणार नाही**

वन नेशन... वन इलेक्शन बाबत पत्रकारांनी विचारले असता, हे फक्त वन नेशन... वन इलेक्शन हा प्रकार नाही. तर वन लीडर आणण्याचा प्रकार आहे. या देशातील संविधान आणि लोकशाही संपवण्याची ही सुरूवात झाली आहे. या निर्णयाने सरळ सरळ लोकशाहीची हत्या होईल. भारतीय संविधानाने दिलेला संसदीय लोकशाहीचा ढाचा उद्ध्वस्त करण्याची आणि त्यातून संविधान संपवण्याची ही तयारी सुरू झाली आहे. पण, आम्ही जीव देऊ पण संविधान बदलू देणार नाही, असा इशाराही डॉ. आव्हाड यांनी यावेळेस दिला.

**थोडक्यात घडामोडी**

## आज ठाण्यातील काही भागात पाणी नाही

ठाणे (१९) : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात मुंब्रा, दिवा, कळवा, माजिवडा- मानपाडा व वागळे (काही भागात) प्रभाग समिती मध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत बारवी गुरूत्व वाहिनीचे कटाई नाका ते शीळ टाकी येथे तातडीचे दुरूस्तीचे काम हाती घेण्यात आले आहे. परिणामी, ठाणे शहरातील काही भागांचा पाणीपुरवठा उद्या शुकवार दिनांक २०/०९/२०२४ रात्री १२.०० वाजेपर्यंत २४ तासांसाठी बंद राहणार आहे. सदर शटडाऊन कालावधीत ठाणे महानगरपालिकेअंतर्गत दिवा, मुंब्रा (प्रभाग क्र. २६ व ३१ चा काही भाग वगळता) आणि कळवा प्रभाग समिती मधील सर्व भागामध्ये व वागळे प्रभाग समिती मधील रुपादेवी पाडा, किसननर नं. २, नेहरुनगर तसेच मानपाडा प्रभाग समिती अंतर्गत कोलशेत खालचा गाव येथील पाणीपुरवठा २४ तासासाठी पूर्णपणे बंद राहील. पाणीपुरवठा सुरू झाल्यानंतर पुढील १ ते २ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होईल याची कृपया नागरिकांनी नोंद घ्यावी. सदर पाणी कपातीच्या कालावधीत पाणी काटकसरीने वापरुन ठाणे महानगरपालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पालिकेतर्फे करण्यात आले आहे.

## गणेशोत्सव संपताच मासळी खरेदीसाठी गर्दी

उरण : गणेशोत्सवात उपवासाचे दिवस संपताच उरणच्या मासळी बाजारात खरेदीसाठी बुधवारी खवय्यांची गर्दी झाली होती. ७ सप्टेंबरपासून गणपती उत्सव असल्याने व त्यापूर्वी श्रावण महिना सुरू होता. त्यामुळे अनेकांचे उपवासाचे दिवस सुरू होते. मात्र हे उपवास अनंत चतुर्दशीला संपले आहेत. त्यानंतर बुधवार हा पहिलाच दिवस आल्याने खवय्यांची मासळी खरेदीसाठी उरणच्या मासळी बाजारात गर्दी झाली होती.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात

**ताज्या मासळीची मागणी**

खोल समुद्रातील मासळीबरोबरच खाडी आणि तळ्यात पाळण्यात येणाऱ्या ताज्या मासळीचीही अधिकची मागणी वाढली आहे. यात मासे, कोळंबी, खेकडे आदी ताजी मासळी बाजारात येऊ लागली आहे.

# 'स्वच्छता ही सेवा' या अभियानाचा राज्यस्तरीय शुभारंभ सफाई कर्मचारी हा मुंबईचा खरा हिरो







मुंबई - देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०१४ साली 'स्वच्छ भारत अभियान' सुरू करून एक चळवळ उभी केली. त्याचे फलित म्हणजे आज देशभरात हे अभियान प्रभावीपणे राबविले जात आहे. स्वच्छता हा आरोग्याचा मंत्र असून मुंबईमध्ये 'डीप क्लिन ड्राईव्ह'च्या माध्यमातून रस्ते साफ करणे, रस्ते झाडणे, पाण्याने रस्ते धुणे हे काम सुरू आहे. यामुळे मुंबईचे प्रदुषण कमी झाले असून सफाई कर्मचारी हाच खरा मुंबईचा हिरो असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

स्वच्छता ही सेवा-२०२४ (SHS) या राज्यस्तरीय अभियानाचा मुंबईतील गिरगाव चौपाटीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला. याप्रसंग्री मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई महानगर पालिका आयुक्त भूषण गगराणी, नगर विकास विभागाचे प्रधान सचिव डॉ.के.एच.गोविंदराज, मुंबई जिल्हाधिकारी संजय यादव, मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे, सेना दलाचे अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी, स्वयंसेवी संस्था, सफाई कर्मचारी, नागरिक आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री शिंदे यांनी शुभारंभ केलेले हे राज्यस्तरीय अभियान महात्मा गांधी जयंती म्हणजे २ ऑक्टोबरपर्यंत चालणार असून राज्यातील नागरी व ग्रामीण भागात 'स्वभाव स्वच्छता - संस्कार स्वच्छता' ही संकल्पना राबविण्यात येणार आहे. (पान २ वर)

## नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांच्या सूचनांच्या अंतर्भाव करून आजतागायतची सर्व बांधकामे आहे त्या स्थितीत नियमित करावीत मगच जीआर काढावा...



- संजीव नाईक, संदीप नाईक यांनी मांडली भूमिका
- बांधकामे नियमित करण्याबरोबरच जमिनीची मालकीही प्रकल्पग्रस्तांना द्यावी

**मुंबई – प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ आणि प्रकल्पग्रस्तांच्या संघटनांनी केलेल्या सर्व सूचनांचा अंतर्भाव करून प्रकल्पग्रस्तांनी कुटुंब विस्तार वाढल्याने उपजीविकेसाठी गरजेपोटी आजतागायत केलेली निवासी आणि वाणिज्यिक बांधकामे त्याखालील जमिनीची मालकी प्रकल्पग्रस्तांना देऊन आहे त्या स्थितीत नियमित करावीत, त्यांना संरक्षण द्यावे, तशा प्रकारचा जीआर तातडीने काढावा, अशी स्पष्ट भूमिका माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक आणि माजी आमदार संदीप नाईक यांनी मांडली आहे.**

राज्याच्या नगर विकास खात्याचे प्रधान सचिव असीम कुमार गुप्ता यांच्या समवेत आज मंत्रालयात झालेल्या एका महत्त्वपूर्ण बैठकीमध्ये प्रकल्पग्रस्तांच्या हिताच्या सूचना संजीव नाईक आणि संदीप नाईक यांनी केल्या. आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी आदी मान्यवर या बैठकीला उपस्थित होते.

प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी केलेली आजतागायतची सर्व प्रकारची बांधकामे जमिनीच्या मालकी हक्कासह नियमित करण्यासाठी लोकनेते आमदार गणेश नाईक निरंतर पाठपुरावा करीत आहेत. शासन स्तरावर, विधानसभा अधिवेशनांमधून लक्षवेधी सूचना, अर्धा तास चर्चा, तारांकित प्रश्न या माध्यमातून, नगर विकास विभागाकडे तसेच सिडको महामंडळ स्तरावर त्यांनी ही मागणी लावून धरली आहे. या विषयी माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक आणि माजी आमदार संदीप नाईक बैठकीत म्हणाले, बांधकामे नियमित करण्याचा जीआर लवकरात लवकर निघालाच पाहिजे. (पान २ वर)

## अखेर भरत गोगावलेंना एसटी महामंडळाचं अध्यक्षपद मिळणार



मुंबई: शिंदे गटात सुरुवातीपासून मंत्रिपदाचे प्रबळ दावेदार मानले जाणारे महाडचे आमदार भरत गोगावले यांना अखेर महत्त्वाची जबाबदारी मिळणार आहे. भरत गोगावले यांची एसटी महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली जाणार आहे. आज दुपारपर्यंत त्यांच्या नियुक्तीचे आदेश निघण्याची शक्यता सूत्रांकडून वर्तविली जात आहे. गेल्या काही दिवसांपासून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून आपल्या पक्षातील नेत्यांना मंत्रिपदाचा दर्जा तसेच महामंडळांवर नियुक्त्या केल्या जात आहेत. यामध्ये आता भरत गोगावले यांची वर्णी लागली आहे.

शिंदे गटातील तीन आमदारांची नुकतीच महामंडळाच्या अध्यक्षपदी वर्णी लागली होती. त्यामध्ये आनंदराव अडसूळ, हेमंत पाटील आणि संजय शिरसाटांच्या नावाचा समावेश आहे. टप्प्याटप्प्याने एकनाथ शिंदेकडून करण्यात येत असलेल्या महामंडळांच्या नियुक्त्यांवरून अजितदादा गटात नाराजी निर्माण झाली आहे.

## ठाणे महानगरपालिका परिवहन सेवेतील निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत देणी एक रक्कमी देण्याची मागणी



(छाया-मनोज सिंह)

ठाणे : ठाणे महानगरपालिकेतील परिवहन सेवेतील निवृत्त कर्मचाऱ्यांची थकीत वेतन गेल्या अनेक वर्षांपासून शासन दरबारी प्रलबित आहेत, मुख्यमंत्र्यांनी आणि प्रशासनाने भेदभाव न करता कर्मचाऱ्यांची संगीत वेणी देण्याची मागणी आता या निवृत्त कर्मचाऱ्यांनी केली आहे.

ठाणे महानगरपालिकेतील परिवहन सेवेमध्ये २०१६ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची थकीत देणे शासन दरबारी प्रलंबित आहे. सदर कर्मचारी परिवहन सेवेमध्ये कायमस्वरूपी कामावर होते ३० ते ३५ वर्षे सेवा त्यांनी या परिवहन सेवेत केल्यानंतर निवृत्ती घेतली. २०१६ नंतर नैवेद्य झालेल्या कर्मचाऱ्यांची विविध प्रकारची थकीत देणे ठाणे महानगरपालिका प्रशासनाकडे प्रलंबित आहेत त्यामध्ये विविध भत्तांचा समावेश आहे. महागाई भत्ता सहावा वेतन आयोग यांसारख्या विविध रकमेचा समावेश असून एकूण कोट्यावधीची रक्कम महानगरपालिकेच्या प्रशासनाकडे थकीत आहे. आयुष्यभर परिवहन सेवेमध्ये कष्ट केल्यानंतर सरते शेवटी मिळणारी आयुष्याची पुंजी अद्याप न मिळाल्याने निवृत्त कर्मचारी व त्यांच्या कुटुंबातील सदस्य (पान २ वर)

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे - ४०१ १०१, दुरध्वनी क्र. ०२२-२८१९२८२८/२८१९३०८७

// प्रथम मुदतवाढ //

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना गणवेश व इतर साहित्य पुरवठा करणेकामी दि. ०५/०९/२०२४ रोजी साप्ताहिक सुरज प्रकाश व दै. महाराष्ट्र सम्राट या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करून टेंडर आय डी क्र. 2024_MBMC_10_79753_1 अन्वये ऑनलाईन निविदा स्विकारण्यासाठी दि. १८/०९/२०२४ रोजी सांय ४:३० वा. पर्यंत मुदत देण्यात आली होती. सदर कामाकरीता निविदा स्विकारण्याची मुदत वाढवून दि. २७/०९/२०२४ रोजी सांय ४:३० वाजेपर्यंत करण्यात येत आहे. सदरकामी प्राप्त निविदा दि. ३०/०९/२०२४ रोजी सांय ४:३० वाजता उघडण्यात येतील.

इतर मजकुरात बदल नाही.

जा.क्र. मनपा/ मावज । ई- २८७२२००/२०२४-२५
दि. १९/०९/२०२४
ठिकाण :- भाईंदर (प)
दिनांक :- १९/०९/२०२४.

सही/-
उपआयुक्त
अग्निशमन व आणीबाणी सेवा
मिरा भाईंदर महानगरपालिका

## शनिवारपासून भारतात प्रथमच जागतिक फिटनेस फेस्टीव्हल

ठाणे – शनिवार आणि रविवारी गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे जागतिक फिटनेस फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिव्हलमध्ये जगभरातील सुमारे सात हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत, अशी माहिती आयोजक एक्टवफिट एक्स्पोचे सीईओ संजय सोलंकी आणि शिवट्रान्स लॉजिस्टीकचे संचालक शुभम द्विवेदी यांनी दिली.

शरीर सोष्ठव क्षेत्रातील जगभरातील दिग्गजांच्या नावाने ऑरनॉल्ड क्लासिक या नावे हा फिटनेस फेस्टीवल आयोजित करण्यात येत असतो. भारतात प्रथमच हा फेस्टिव्हल आयोजित करण्यात आला आहे. या फेस्टिव्हलमध्ये मिक्स मार्शल आर्ट, बॉडी बिल्डींग, पॉवर लिफ्टिंग, वेट लिफ्टिंग, किक बॉक्सींग, स्ट्राँग मॅन इव्हेंट अशा पद्धतीच्या शारिरीक कौशल्याच्या स्पर्धा पार पडणार आहेत. जगभरातून साधारणपणे दहा हजार लोक या फेस्टिव्हलमध्ये सहभागी होणार असून सात हजार लोक प्रत्यक्ष स्पर्धेत सहभाग नोंदविणार आहेत. या स्पर्धेत जिंकणाऱ्या भारतीय स्पर्धकांना पुढील वर्षी म्हणजेच २०२५ मध्ये स्पेनमध्ये होणाऱ्या जागतिक स्पर्धेमध्ये सहभाग नोंदविता येणार आहे, अशी माहिती शुभम द्विवेदी यांनी दिली.

दरम्यान, या स्पर्धेच्या अनुषंगाने अनेक आंतरराष्ट्रीय कंपन्या भारताशी सहकार्य करार करणार आहेत. या स्पर्धेचा उद्घाटन सोहळा शनिवारी सकाळी १० वाजता होणार आहे, असेही द्विवेदी यांनी सांगितले.

# सिडको प्रकल्पग्रग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत बैठक

### प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या बाबींचा समावेश करण्याची आमदार प्रशांत ठाकूर यांची मागणी

**पनवेल (प्रतिनिधी) सिडको प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्याबाबत नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता यांच्या प्रमुख उपस्थितीत आज मुंबई येथे त्यांच्या दालनात बैठक पार पडली. या बैठकीस आमदार मंदा म्हात्रे, माजी खासदार डॉ. संजीव नाईक, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, माजी आमदार संदीप नाईक, पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक अमर पाटील, सिडकोचे अधिकारी उपस्थित होते.**



प्रकल्पग्रस्तांची गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करण्यासाठी सर्वसमावेशक निर्णय घेण्याबाबत राज्य शासनाकडून अंतिम कार्यवाही सुरु आहे, त्याच अनुषंगाने प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या बाबींचा त्यात समावेश करावा, अशी आग्रही मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी आज मुंबई येथे झालेल्या नगरविकास विभागाच्या बैठकीत केली.

ामदार प्रशांत ठाकूर यांनी या संदर्भात प्रधान सचिव असिमकुमार गुप्ता यांना निवेदनही दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, स्थानिक आमदार, लोकप्रतिनिधी म्हणून आम्ही सातत्याने मुख्यमंत्री साहेब तसेच पालकमंत्री यांना प्रत्यक्ष भेटून आणि पत्राद्वारे सिडको प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांबाबत ती नियमित करून सकारात्मक निर्णय घेण्याकरिता पाठपुरावा करीत आहोत. त्या अनुषंगाने सदर घरे नियमित करत असताना प्रकल्पग्रस्तांच्या बाबतीतील बाबींचा अंतर्भाव अत्यंत आवश्यक आहे.

प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करताना गावठाणाबाहेरील प्रकल्पग्रस्तांनी बांधलेल्या विशिष्ट हद्दीचा विचार न करता अर्थात सर्व बांधकामांचा विचार होणे आवश्यक असून प्रकल्पग्रस्तांनी बांधलेल्या निवासी बांधकामांसोबतच अंशतः वाणिज्य किंवा भाडेकरू वापर (निवासी/वाणिज्य/भाडेकरू वापर) ही बांधकामेदेखील नियमित करणे गरजेचे आहे. कारण बऱ्याच ठिकाणी त्यावरच प्रकल्पग्रस्तांच्या कुटूंबियांची उपजिविका अवलंबून आहे, त्यामुळे याबाबतही सकारात्मक कार्यवाही झाली पाहिजे. सिडको व्यतिरिक्त नवी मुंबईतील या ९५ गावाअंतर्गत एमआयडीसी अथवा अन्य शासकीय जमिनीवरील प्रकल्पग्रस्तांची घरे देखील नियमित होणे आवश्यक आहे. बिगर प्रकल्पग्रस्तांकरिता रहिवासी वापराकरीता नियमित करणेबाबत शासनाचा / सिडकोचा दर देखील मर्यादित राहिला पाहिजे कारण ही बांधकामे प्रकल्पग्रस्तांनीच

बांधलेली असून बिगरप्रकल्पग्रस्तांना राहण्याकरिता अथवा भाडेतत्त्वावर दिलेली आहेत. (त्यामुळे दर हा सिडको ठशीर्शींश झीळलश च्या ३०% ते ५०% असावा ३०० % नको), यापूर्वी ज्यांना १२.५% योजनेअंतर्गत भूखंडांचे वाटप झाले आहे व ज्यांची बांधकामाची पात्रता त्यामधून वगळण्यात आलेली आहे, सर्वप्रथम अशा सर्व प्रकल्पग्रस्तांची नोड निहाय माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच त्या सर्व प्रकल्पग्रस्तांना जर त्यांच्या वगळलेल्या पात्रतेएवढा भूखंड देणे शक्य नसेल तर वगळलेल्या क्षेत्राएवढा टीडीआर देण्यात यावा व तो टीडीआर त्याच क्षेत्रांत अथवा नोडमध्ये वापरणे शक्य नसल्यास, आजूबाजूच्या क्षेत्रांत अथवा नोडस् मध्ये वापरण्यासाठी परवानगी देण्यात यावी. प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करीत असताना गावठाणामध्ये अथवा गावठाणाबाहेर अस्तित्वातील कातकरी, ठाकूर, मागासवर्गीय तसेच अन्य भूमीहीन कुटूंबांची घरे देखील नियमित करणेबाबत निर्णय होणे गरजेचे आहे. गरजेपोटी घरे नियमित करीत असताना, मुख्य रस्ते, मुलभूत सोयीसुविधा, सामाजिक सेवा भूखंड, आरक्षण, डीपी आरक्षण अशा ठिकाणी येणाऱ्या सर्व जुन्या बांधकामांना योग्य तो मोबदला अथवा टीडीआर देणे आवश्यक आहे. गरजेपोटी क्षेत्राबाहेरील भूखंडांचे सिडकोतर्फे वाटप करताना त्या परिसराकरिता सामाजिक सुविधा तसेच नागरिकांच्या सामाजिक सोयींकरता प्रथमतः भूखंड आरक्षित ठेवणे आवश्यक आहे. त्यानंतर उर्वरीत भूखंडांचे (१२.५%) वाटप करणे गरजेचे आहे. या बाबी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उल्लेखित करून प्रकल्पग्रस्तांनी गरजेपोटी बांधलेली घरे नियमित करून त्यांना दिलासा देताना या बाबींचाही त्यात समावेश करावा, अशी मागणी या बैठकीत केली .



■ गणेशोत्सवानिमित्त शिवसेना ठाणे शहरप्रमुख, माजी महापौर अशोकजी वैती व कु. आदिती अशोक वैती यांच्या समवेत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे यांच्या शाासकीय निवासस्थानी (वर्षा बंगल्यावर) विराजमान गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले.



■ अनंत चतुर्थीनिमित्त लाडक्या गणरायाला निरोप देताना विसर्जन स्थळावर उपस्थित मा. नगरसेविका सौ. अर्चना किरण मणेरा व डॉ. किरण मणेरा...

## आज ठाणे जिल्ह्यातील ५८ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या शुभहस्ते ऑनलाईन उद्घाटन....

ठाणे – कौशल्य विकास या संकल्पनेचा अधिकाधिक लाभ राज्यातील युवक युवतींना व्हावा, या दृष्टीकोनातून राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करुन महाविद्यालयीन युवक युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर राज्यातील १००० नामांकित महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र ची स्थापना करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ५ ८ महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या या केंद्रांचे मा.पंतप्रधान यांच्या शुभहस्ते २० सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी १२.३० वा. ऑनलाईन उद्घाटन होणार आहे. या केंद्रांमधून मोफत कौशल्य विकास कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, आर . जे . ठाकूर महाविद्यालय, श्रीमती सी. एच. एम. कॉलेज, जीवनदीप कॉलेज, इंदाला, इ. महाविद्यालयांचा सहभाग असून AI सारख्या अत्याधुनिक कौशल्याचा समावेश आहे.




'महाराष्ट्र सम्राट' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक चंद्रकांत शंकरराव भोईटे यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँड पब्लिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट नंबर – डब्लू २३० टी.टी.सी. इंडस्ट्रियल एरिया, कोपर खैरणे, एम.आय.डी.सी., ठाणे बेलापूर रोड, नवी मुंबई – ४००७१० येथे छापून ३०२, हार्मोनी टॉवर, भारत ज्वेलर्स समोर, नेताजी सुभाष चंद्र रोड, कोर्ट नाका, ठाणे पश्चिम – ४००६०१ (महाराष्ट्र ) येथे प्रकाशित केले. संपादक – चंद्रकांत शंकरराव भोईटे ■ RNI - MAHMAR/2012/44140 ■ मो. नं. : +९१-९१६७९५७७७१